07 AUG 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शिस्तीच्या दृष्टीने 'सहा गठ्ठा पद्धती' उपयुक्त

## तज्ज्ञ मार्गदर्शक उदय भोसले यांचे प्रतिपादन : प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रशासकीय कामकाजामध्ये सुसूत्रता व शिस्त येण्याच्या दृष्टीने सहा गठ्ठा पद्धती अत्यंत उपयुक्त सिद्ध झाली आहे. प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी तिचा अवलंब केल्यास तणावरहित पद्धतीने कामाचा निपटारा करणे शक्य आहे, असे प्रतिपादन तज्ज्ञ मार्गदर्शक उदय भोसले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा आस्थापना विभाग आणि ॲकॅडमी फॉर ॲकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी कार्यालयीन अभिलेख जतन आणि वर्गीकरण यासंदर्भातील कार्यशाळा आयोजित केली होती. 'सिक्स बन्डल सिस्टीम'(सहा गठ्ठा पद्धती) हा या कार्यशाळेचा विषय होता. याप्रसंगी ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील प्रमुख पाहुण्या होत्या.




कोल्हापूर : सहा गठ्ठा पद्धतीविषयी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना तज्ज्ञ मार्गदर्शक उदय भोसले.

भोसले म्हणाले, शासकीय अभिलेख्यांचे जतन, संवर्धन आणि नाशन या सर्वच बाबतीत सहा गठ्ठा पद्धती अत्यंत सुलभ आणि उपयुक्त आहे. कागदपत्रे त्वरित प्राप्त होणे, कामे त्वरित आणि वेळेत मार्गी लावणे, कामामध्ये दर्जावृद्धी आणि सुसूत्रता येणे अशा सर्व बाबी या पद्धतीच्या अवलंबातून साध्य होतात. वेळेची व श्रमाची बचत होण्याबरोबरच शासकीय दप्तराचे अद्ययावतीकरणही यामुळे शक्य होते. कर्मचाऱ्यांवरील कामाचा तणाव यामुळे बराचसा कमी होतो आणि शिस्तबद्ध कामकाजाची सवय मिनल्यामुळे आपोआपच डेली डिस्पोजल होऊ लागते आणि झिरो पेन्डन्सीकडे वाटचाल होऊन गतिमान कारभार शक्य होतो.

वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील म्हणाल्या, सहा गठ्ठा पद्धती ही प्रशासनात फार महत्त्वाची असते. अभिलेख हे कार्यालयाचा आरसा असतात. दाखल होणाऱ्या प्रकरणांची निर्गत वेळच्यावेळी, विहीत मुदतीत होण्याच्या दृष्टीने सहा गठ्ठा पद्धतीचा अवलंब करावा. जेणे करून कामाचा ताण येणार नाही. तसेच जुनी, प्रलंबित प्रकरणेही वेळेत मार्गी लागतील. जुन्या अभिलेखांच्या जतनाबरोबरच नवतंत्रज्ञानाच्या अंगिकारातून कामकाज गतिमान करण्यालाही प्राधान्य देणे आवश्यक आहे.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कार्यालयीन कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेणे आवश्यक असते. दैनंदिन कामकाजाचे नियोजन योग्य पद्धतीने करण्याचा हा कालखंड आहे. त्यासाठी सहा गठ्ठा पद्धतीबरोबरच आधुनिक साधनांचाही वापर करावा. उत्कृष्ट प्रशासनाच्या बाबतीत शिवाजी विद्यापीठाचा लौकिक सर्वदूर आहे. तो टिकवावा आणि वृद्धिंगत होण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करावेत. व्यक्तीगत तसेच कार्यालयीन स्वास्थ्य जपण्यास प्राधान्य द्यावे. आजच्या प्रशिक्षणातून आपल्यातलेही काही जण प्रशिक्षक म्हणून तयार व्हावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

ॲकॅडमीचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 AUG 2024

पुढारी

# प्रशासकीय शिस्तीच्यादृष्टीने 'सहा गठ्ठा पद्धती' उपयुक्त

## भोसले : विद्यापीठात प्रशिक्षण कार्यशाळेस प्रारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

प्रशासकीय कामकाजामध्ये सुसूत्रता व शिस्त येण्याच्यादृष्टीने सहा गठ्ठा पद्धती उपयुक्त सिद्ध झाली आहे. प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी तिचा अवलंब केल्यास तणावरहित पद्धतीने कामाचा निपटारा करणे शक्य आहे, असे प्रतिपादन तज्ज्ञ मार्गदर्शक उदय भोसले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आस्थापना विभाग व ॲकॅडमी फॉर ॲकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेटर्सच्या संयुक्त विद्यमाने अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी कार्यालयीन अभिलेख जतन आणि वर्गीकरण यासंदर्भातील सिक्स बन्डल सिस्टीम (सहा गठ्ठा पद्धती) च्या अनुषंगाने दोन दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील प्रमुख उपस्थित होत्या.



कार्यशाळेत बोलताना श्री. भोसले

भोसले म्हणाले, सहा गठ्ठा पद्धतीने वेळेची व श्रमाची बचत होण्याबरोबरच दप्तराचे अद्ययावतीकरण शक्य होते. कर्मचाऱ्यांवरील ताण बराचसा कमी होतो. झीरो पेन्डन्सीकडे वाटचाल होऊन गतिमान कारभार शक्य होतो. अभिलेख वर्गीकरण, परीक्षण व नाशन या संदर्भातही त्यांनी तपशीलवार मार्गदर्शन केले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कार्यालयीन दप्तराचा, कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेणे आवश्यक असते. त्यासाठी सहा गठ्ठा पद्धतीबरोबरच आधुनिक साधनांचाही वापर करावा. आता कागदविरहित होण्याकडे वाटचाल करावी. डॉ. सुभाष कोंबडे यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 AUG 2024
लोकमत

# प्रशासकीय कामकाजात 'सहा गठ्ठा पद्धती' उपयुक्त

## उदय भोसले : विद्यापीठात कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : प्रशासकीय कामकाजामध्ये सुसूत्रता व शिस्त येण्याच्या दृष्टीने सहा गठ्ठा पद्धती अत्यंत उपयुक्त असल्याचे सिद्ध झाले आहे. प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी तिचा अवलंब केल्यास तणावरहित पद्धतीने कामाचा निपटारा करणे शक्य आहे, असे प्रतिपादन तज्ज्ञ मार्गदर्शक उदय भोसले यांनी मंगळवारी केले.

विद्यापीठाचा आस्थापना विभाग आणि अकॅडमी फॉर अकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेटर्स यांच्यावतीने प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी कार्यालयीन अभिलेख जतन आणि वर्गीकरण यासंदर्भातील 'सिक्स बन्डल सिस्टिम' (सहा गठ्ठा पद्धती) च्या अनुषंगाने दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. यावेळी भोसले बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. तर, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील प्रमुख पाहुण्या होत्या.

भोसले म्हणाले, शासकीय अभिलेख्यांचे जतन, संवर्धन आणि



नाशन या सर्वच बाबतीत सहा गठ्ठा पद्धती अत्यंत सुलभ आणि उपयुक्त आहे. कागदपत्रे त्वरित प्राप्त होणे, कामे त्वरित आणि वेळेत मार्गी लावणे, कामामध्ये दर्जावृद्धी आणि सुसूत्रता येणे अशा सर्व बाबी या पद्धतीच्या अवलंबातून साध्य होतात. वेळेची व श्रमाची बचत होण्याबरोबरच शासकीय दप्तराचे अद्ययावतीकरणही यामुळे शक्य होते.

डॉ. शिर्के म्हणाले, कार्यालयीन दप्तराचा, कामकाजाचा आढावा घेणे आवश्यक असते. दैनंदिन नियोजन योग्य करण्याचा हा कालखंड आहे. त्यासाठी सहा गठ्ठा पद्धतीबरोबरच आधुनिक साधनांचाही वापर करावा. कमी कागद वापराकडून कागदविरहित होण्याकडे वाटचाल करावी. डॉ. सुभाष कोंबडे यांनी स्वागत केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 AUG 2024
पुण्यनगरी

# पालकांनो, पाल्यांना स्वातंत्र्य द्या : डॉ. शिंदे



उत्तूर : 'पार्वती-शंकर'मध्ये पालक मेळाव्यात बोलताना डॉ. व्ही. एन. शिंदे. उपस्थित विश्वनाथ करंबळी, दिनकर घेवडे व अन्य.

उत्तूर : प्रतिनिधी

पाल्याच्या कर्तृत्वाच्या पंखांना ताकद देण्यासाठी पालकांनी पाल्यांना स्वातंत्र्य द्यावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. उत्तूर (ता. आजरा) येथील पार्वती-शंकर शैक्षणिक संकुलातील पालक मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपाध्यक्ष विश्वनाथ करंबळी होते.

संचालक विनायक करंबळी यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. दिनकर घेवडे यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव शिंदे म्हणाले, मोबाईलचा वापर योग्य कारणासाठी करा. पालकांनी जागरूकपणे अयोग्य मार्गांना प्रतिबंध केला पाहिजे. मनापासून काम केल्यास उच्चपदापर्यंत पोहोचता येते. यावेळी इयत्ता दहावी परीक्षेतील ९० टक्केहून अधिक गुण घेतलेले विद्यार्थी, शिष्यवृत्तीधारक, विविध स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्राथमिक विभागाचा आदर्श विद्यार्थी, विद्यार्थिनी, आदर्श पालक पुरस्कार देण्यात आले.

यावेळी उपाध्यक्ष विश्वनाथ करंबळी, विनायक करंबळी, सचिन कलस, अनिल मोहिते, भारती शिवणे, वैशाली पाटील, वैशाली पाटील, पंडित वंजारे आदी उपस्थित होते. मेळाव्यासाठी संस्थेचे अध्यक्ष बसवराज करंबळी व संचालकांचे मार्गदर्शन लाभले. पी. एन. केसरकर यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 AUG 2024
पुढारी

# प्राध्यापक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान असायला हवेत : डॉ. शिंदे

**कोल्हापूर :** प्राध्यापक हे विद्यार्थ्यांसाठी सकारात्मक दृष्टिकोन असणारे प्रेरणास्थान असायला हवेत. विद्यार्थ्यांना समजून घेण्यासाठी भावनिक बुद्धिमत्ता प्रत्येकामध्ये निर्माण व्हायला हवी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या सॉफ्ट स्किल्स ट्रेनर डॉ. वैशाली शिंदे यांनी केले. विवेकानंद कॉलेजमध्ये आयक्यूएसी व इंग्रजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने प्राध्यापकांसाठी 'नॅकला सामोरे जाताना' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. आर. आर. कुंभार होते. पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे प्राध्यापकांनी नॅक पियर टीमला सामोरे जाताना कोणत्या बाबींचा अभ्यास आणि विचार करायला हवा, याबाबत शिंदे यांनी मार्गदर्शन केले. इंग्रजी विभागप्रमुख डॉ. कविता तिवडे यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले.

07 AUG 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वनस्पतीच्या नवीन प्रजातीला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव

## विशाळगडावर शोध : न्यू कॉलेजच्या संशोधकांची कृतज्ञता

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : न्यू कॉलेजमधील वनस्पतीशास्त्र विभागातील अक्षय जंगम, रतन मोरे, डॉ. नीलेश पवार आणि चांदवड (नाशिक) येथील डॉ. शरद कांबळे यांनी शिवाजी विद्यापीठामधील प्रा. डॉ. एस. आर. यादव यांच्या मार्गदर्शनाखाली विशाळगडावर कंदील पुष्प वर्गातील वनस्पतीची नवीन प्रजाती शोधली. या वनस्पतीच्या प्रजातीला सेरोपेजिया शिवरायींना असे नामकरण करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली.

याबाबतचा शोधनिबंध न्यूझीलंड येथून प्रकाशित होणाऱ्या फायटोटॅक्सा या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात नुकताच प्रकाशित झाला. याप्रकारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने प्रथमच एका वनस्पतीच्या प्रजातीला संबोधित केले जाणार आहे. डॉ. पवार, जंगम गेली सहा वर्षे जिल्ह्यातील किल्ल्यावरील वनस्पतींचा अभ्यास करत आहेत. त्याअंतर्गत काम सुरू असताना ऑगस्ट २०२३ मध्ये विशाळगडावर कंदीलपुष्प वर्गातील एक



वेगळी वनस्पती आढळली. भारतामधील कंदीलपुष्प वर्गाचे तज्ज्ञ असणारे डॉ. कांबळे यांनी या वनस्पतीची सखोल पाहणी केली असता ही नवीन प्रजाती असण्याची शक्यता व्यक्त केली. त्यानंतर विद्यापीठातील वनस्पती शास्त्रज्ञ प्रा. एस. आर. यादव ज्यांनी या सेरोपेजिया वर्गाला भारतभर एक वेगळी ओळख निर्माण करून दिली आहे आणि ज्यांनी आत्तापर्यंत या वर्गातील सहा नवीन प्रजाती शोधून काढल्या आहेत. त्यांनी अंतिम निरीक्षणानंतर संबंधित वनस्पती ही नवीन प्रजाती म्हणून घोषित होऊ शकते, यावर शिक्कामोर्तब केले. त्यासंबंधी शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकात पाठविला. या नवीन प्रजातीच्या अधिवासाचा विचार करता गडावर याची संख्या मर्यादित असली तरी आजूबाजूच्या डोंगररांगांमध्येही ही प्रजाती आढळू शकते, अशी शक्यता संशोधकांनी व्यक्त केली. या संशोधनासाठी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, श्री. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांचे सहकार्य लाभले.

### जैवविविधता संवर्धनाबाबत छत्रपती शिवराय काटेकोर

या नवीन प्रजातीला महाराजांचे नाव देण्याचे कारण म्हणजे छत्रपती शिवरायांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ याच सह्याद्रीमध्ये रोवत असताना स्वराज्य रक्षणात गडांचे त्याचबरोबर सभोवतालच्या जंगलांचे महत्त्व जाणले. गडकिल्ल्यांच्या माध्यमातून वनस्पतींसाठी जणूकाही संरक्षित क्षेत्रेच राखीव केली. त्यावरून ते जैवविविधता संवर्धनाबाबत किती अग्रेसर आणि काटेकोर होते, हे लक्षात येते. त्यामुळे या कंदीलपुष्प कुळातील वनस्पतीच्या नवीन प्रजातीला छत्रपती शिवरायांचे नाव देऊन त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केल्याचे संशोधकांनी सांगितले.

0 7 AUG 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विशाळगडावरील वनस्पतीच्या नवीन प्रजातीला शिवाजी महाराजांचे नाव

## न्यू कॉलेज, शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांची कृतज्ञता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विशाळगडावर शोधलेल्या कंदीलपुष्प वर्गातील वनस्पतीच्या नवीन प्रजातीचे 'सेरोपेजिया शिवरायीना' असे नामकरण करून न्यू कॉलेज व शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे. या संदर्भातील शोधनिबंध न्यूझीलंड येथून प्रकाशित होणाऱ्या 'फायटोटॅक्स' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात नुकताच प्रकाशित झाला आहे.

न्यू कॉलेज वनस्पतीशास्त्र विभागातील अक्षय जंगम, रतन मोरे व डॉ. नीलेश पवार व चांदवड नाशिक येथील डॉ. शरद कांबळे आणि शिवाजी विद्यापीठामधील प्रा. डॉ. एस. आर. यादव यांच्या चमूने हे संशोधन केले आहे. अक्षय जंगम व डॉ. नीलेश पवार गेली सहा वर्षे कोल्हापूर जिल्ह्यातील किल्ल्यांवरील वनस्पतींचा अभ्यास करत आहेत.



त्याअंतर्गत काम सुरू असताना ऑगस्ट २०२३ मध्ये विशाळगडावर कंदीलपुष्प वर्गातील एक वेगळी वनस्पती आढळली.

भारतामधील कंदीलपुष्प वर्गाचे तज्ज्ञ डॉ. शरद कांबळे यांनी वनस्पतीची पाहणी केली असता ही नवीन प्रजाती असण्याची शक्यता व्यक्त केली. त्यानंतर शिवाजी विद्यापीठातील वनस्पती शास्त्रज्ञ प्रा. एस. आर. यादव यांनी अंतिम निरीक्षणानंतर

> गेली पाच वर्षे कोल्हापूर जिल्ह्यातील किल्ल्यांवर असणाऱ्या वनस्पतींचा अभ्यास करत असताना विशाळगडावर वनस्पतीची नवीन प्रजाती मिळाली. जैवविविधता संवर्धनाचा संदेश साडेतीनशे वर्षांपूर्वी देणाऱ्या युगपुरुष शिवाजी महाराजांचे नाव या वनस्पतीला देण्याचा आनंद आमच्यासाठी सर्वोच्च आहे.
>
> - डॉ. नीलेश पवार, संशोधक

वनस्पती ही नवीन प्रजाती म्हणून घोषित होऊ शकते, असे सांगितले. त्यासंबंधी शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकात पाठविण्यात आला. या नवीन प्रजातीच्या अधिवासाचा विचार करता गडावर याची संख्या मर्यादित असली तरी आजूबाजूच्या डोंगर रांगांमध्ये ही प्रजाती आढळू शकते, अशी शक्यता संशोधकांनी व्यक्त केली. न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, संस्थेचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांचे सहकार्य लाभले.

### ...म्हणूनच छत्रपती शिवरायांचे नाव दिले

शिवरायांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ सह्याद्रीमध्ये रोवताना स्वराज्य रक्षणात गडांचे, त्याचबरोबर सभोवतालच्या जंगलांचे महत्त्व जाणले. गडकिल्ल्यांच्या माध्यमातून वनस्पतींसाठी जणूकाही संरक्षित क्षेत्रेच राखीव केली. आज्ञापत्रात रयतेसाठी 'गडाची राखण म्हणजे कलारम्याची झाडी, ते झाडी प्रयत्ने वाढवावी, त्यामध्ये येक काठी तेही तोडू न द्यावी' असे आवाहन केले. यावरून छत्रपती शिवराय जैवविविधता संवर्धनाबाबत अग्रेसर, काटेकोर होते लक्षात येते. म्हणूनच नवीन प्रजातीला महाराजांचे नाव दिले आहे.

07 AUG 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


विशाळगडावर शोध : न्यू कॉलेजच्या संशोधकांची अनोखी कृतज्ञता

# 'कंदील पुष्प' वनस्पतीला छत्रपती शिवरायांचे नाव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : येथील न्यू कॉलेजच्या अक्षय जंगम, रतन मोरे व डॉ. नीलेश पवार, चांदवड येथील डॉ. शरद कांबळे आणि शिवाजी विद्यापीठामधील प्रा. डॉ. एस. आर. यादव यांच्या चमूने विशाळगडावर कंदील पुष्प वर्गातील वनस्पती शोधली असून, या नवीन प्रजातीचे सेरोपेजिया शिवरायीना असे नामकरण केले आहे.

या संदर्भातील शोधनिबंध न्यूझीलंड येथून प्रकाशित होणाऱ्या फायटोटॅक्सा या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रकाशित झाला. अशा प्रकारे शिवाजी महाराज यांच्या नावाने प्रथमच एका वनस्पतीच्या प्रजातीला संबोधित केले जाणार असून याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवरील शास्त्रज्ञाकडून घेतली जाणार आहे. अक्षय जंगम व डॉ. नीलेश पवार गेली सहा वर्षे जिल्ह्यातील किल्ल्यावरील वनस्पतींचा अभ्यास करत आहेत. त्याअंतर्गत ऑगस्ट २०२३ मध्ये विशाळगडावर कंदील पुष्प वर्गातील एक वेगळी वनस्पती आढळली. भारतामधील कंदील पुष्प वर्गाचे तज्ज्ञ असणारे मूळचे कोल्हापूरचे डॉ. शरद कांबळे, प्रा. एस. आर. यादव यांनी निरीक्षणानंतर ही वनस्पती नवीन प्रजाती म्हणून घोषित होऊ शकते यावर शिक्कामोर्तब केले. या प्रजातीच्या अधिवासाचा विचार करता गडावर याची संख्या मर्यादित असली तरी डोंगररांगांमध्येसुद्धा ही प्रजाती आढळू शकते. यासाठी न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांचे सहकार्य लाभले.



## वनस्पतींसाठी संरक्षित क्षेत्र

शिवरायांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ याच सह्याद्रीमध्ये रोवत असताना स्वराज्य रक्षणात गडांचे त्याचबरोबर सभोवतालच्या जंगलांचे महत्त्व जाणले. गडकिल्ल्यांच्या माध्यमातून वनस्पतींसाठी संरक्षित क्षेत्रेच राखीव केली. एवढेच नव्हे तर आज्ञापत्रात रयतेसाठी "गडाची राखण म्हणजे कलारग्याची झाडी, ती झाडे वाढवावीत, तोडू न द्यावी" असे आवाहन केले होते. त्यामुळेच या कंदील पुष्प कुळातील वनस्पतीच्या नवीन प्रजातीला शिवरायांचे नाव देण्यात आले.

07 AUG 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विशाळगडावरील वनस्पतीच्या नवीन प्रजातीला छत्रपती शिवरायांचे नाव

## न्यू कॉलेजच्या संशोधकांची अनोखी कृतज्ञता

कोल्हापूर : प्रतिनिधी

विशाळगडावरून शोधलेल्या कंदीलपुष्प वर्गातील वनस्पतीच्या नवीन प्रजातीचे 'सेरोपेजिया शिवरायीना' असे नामकरण करून संशोधक विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे. हे संशोधक विद्यार्थी न्यू कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागाचे आहेत. अक्षय जंगम, रतन मोरे व डॉ. निलेश पवार तसेच चांदवड नाशिक येथील डॉ. शरद कांबळे आणि शिवाजी विद्यापीठामधील प्रा. डॉ. एस. आर. यादव यांच्या चमूने या वनस्पतीचा शोध घेऊन त्यावर अभ्यास केला.

या संदर्भातील शोधनिबंध न्यूझीलंड येथून प्रकाशित होणाऱ्या फायटोटॅक्सा या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात नुकताच प्रकाशित झाला. अक्षय जंगम आणि डॉ. निलेश पवार गेली सहा वर्षे जिल्ह्यातील किल्ल्यावरील वनस्पतींचा अभ्यास करत आहेत. त्याअंतर्गत काम चालू असताना ऑगस्ट २०२३ मध्ये विशाळगडावर कंदीलपुष्प वर्गातील एक वेगळी वनस्पती आढळली.



भारतामधील कंदीलपुष्प वर्गाचे तज्ज्ञ असणारे मूळचे कोल्हापूरचे पण सध्या नाशिक येथे कार्यरत असणारे डॉ. शरद कांबळे यांनी या वनस्पतीची सखोल पाहणी केली असता ही नवीन प्रजाती असण्याची शक्यता व्यक्त केली. यानंतर शिवाजी विद्यापीठातील वनस्पती शास्त्रज्ञ प्रा. एस. आर. यादव, ज्यांनी या सेरोपेजिया वर्गाला भारतभर एक वेगळी ओळख निर्माण करून दिली आहे आणि आत्तापर्यंत ६ नवीन प्रजाती शोधून काढल्या आहेत, त्यांनी अंतिम निरीक्षणानंतर ही वनस्पती नवीन प्रजाती म्हणून घोषित होऊ शकते यावर शिक्कामोर्तब केले. त्या संबंधी शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकात पाठवण्यात आला. या नवीन प्रजातीच्या अधिवासाचा विचार करता गडावर याची संख्या मर्यादित असली तरी आजूबाजूच्या डोंगररांगांमध्ये ही प्रजाती आढळू शकते अशी शक्यता संशोधकांनी व्यक्त केली. या संशोधन कार्यासाठी न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांचे सहकार्य लाभल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

संशोधक विद्यार्थ्यांनी सांगितले की, या नवीन प्रजातीला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याचे कारण म्हणजे शिवरायांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ याच सह्याद्रीमध्ये रोवली. तसेच स्वराज्य रक्षणात गडांचे, सभोवतालच्या जंगलाचे महत्त्व जाणले. गडकिल्ल्यांच्या माध्यमातून वनस्पतींसाठी जणूकाही संरक्षित क्षेत्रेच स्वराज्यात राखीव केली होती. एवढेच नव्हे तर आज्ञापत्रात रयतेसाठी वृक्ष संवर्धनाचे महत्त्व सांगितले.

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# New flowering plant species discovered near Vishalgad


Rahul.Gayakwad
@timesofindia.com

**Kolhapur:** A new flowering plant species from 'ceropegia' genus has been discovered inside the Vishalgad premises and named 'ceropegia shivrayiana' in a nod to Chhatrapati Shivaji Maharaj.

A research paper in this regard was published on Tuesday in Phytotaxa, an international journal published in New Zealand. This discovery also highlighted the biodiversity and ecological importance of Vishalgad Fort.

Akshay Jangam, Ratan More, and Dr Nilesh Pawar from the botany department of New College in Kolhapur, Dr Sharad Kamble from Chandwad in Nashik, and Prof Dr. S. R. Yadav from Shivaji University, Kolhapur discovered this new species of plant belonging to the ceropegia family.

Pic courtesy: Akshay Jangam



The new species is named after Chhatrapati Shivaji Maharaj

Akshay Jangam and Dr. Nilesh Pawar have been studying the flora of the fort in Kolhapur district for the past six years. In August 2023, a different plant of ceropegia (kandil pushp) class was found at Vishalgad Fort. An expert on ceropegia species in India, Dr Kamble, who is originally from Kolhapur but currently working in Nashik, said there is a possibility that the flowering plant is a new species.

Plant scientist from Shivaji University Prof. S. R. Yadav, who has earlier discovered six new species of this 'Ceropegia' and given a distinct identity to this species throughout India, after final observations, concluded that the plant can be declared a new species. Accordingly, the research paper was submitted to the international journal.

Researcher Akshay Jangam said, "This species has been named in honour of great Maratha warrior, Chhatrapati Shivaji Maharaj, also known as Chhatrapati Shivray. The plant was discovered on one of his renowned forts, Vishalgad, further highlighting the rich biodiversity and historical significance of the region. This discovery not only adds to the botanical heritage of India but also pays tribute to the enduring legacy of Chhatrapati Shivaji Maharaj."

Dr Pawar said, "The reason for giving the name of Shivaji Maharaj to this new species is that Shivray realised the importance of the forts as well as the surrounding forests in the defence of Swarajya. Through his orders, he had reserved protected areas for plants through the forts in Sahyadri's."

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 AUG 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठातर्फे 'फोटो ऑफ द वीक' स्पर्धेचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक आणि प्रशासकीय सेवक यांच्यातील सृजनशीलतेला संधी देण्याच्या हेतूने विद्यापीठामार्फत 'फोटो ऑफ द वीक' ही स्पर्धा दर आठवड्याला ऑनलाईन स्वरूपात आयोजित करण्यात येत आहे. या स्पर्धेमध्ये विद्यापीठात प्रवेशित विद्यार्थ्यांनी आवर्जून सहभाग नोंदवावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी सोमवारी केले. त्यांच्या हस्ते विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात येणारी फोटो ऑफ द वीक ही स्पर्धा विद्यापीठ अधिविभागामधील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

ही स्पर्धा ऑनलाईन स्वरूपात विद्यापीठ पोर्टलवर घेण्यात येणार आहे. संगणक केंद्र संचालक अभिजित रेडेकर आणि आशिष घाटे यांनी स्पर्धेविषयी सादरीकरण केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी प्रास्ताविक केले.


उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, पदार्थविज्ञान विभागाचे डॉ. मानसिंग टाकळे उपस्थित होते.

07 AUG 2024

पुण्यनगरी


जनसंपर्क कक्ष
…वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विज्ञान-तंत्रज्ञान



डॉ. व्ही.एन. शिंदे

# दरडी कोसळती..!



'आसेतुहिमाचल' सर्वत्र नियोजित पद्धतीने पाऊस सुरू झाला आहे. यावर्षी पाऊस भरपूर पडणार हे हवामान खात्याने सुरुवातीलाच म्हणजे एप्रिलमध्ये जाहीर केले. शेतकऱ्यांसाठी सुखाच्या बातम्या मान्सून केरळमध्ये आला..., गोव्यात आला.., कोकणात आला. या सर्व गदारोळात निसर्गाचे नेमके म्हणणे काय आहे, याचा विचार खूप कमी लोकांनी केला. निसर्ग संकेतानुसार जूनच्या पहिल्या आठवड्यापासून बेतास बेत पाऊस पडणार... पेरण्या होतील पिके वाढण्यासाठी पाऊस पडेल... मात्र, अपेक्षित पाऊस जुलैच्या उत्तरार्धात पडेल, असे निसर्ग सांगत होता. टिटवीच्या अंडी घालण्याची वेळ आणि संख्या उशिरा पण भरपूर पाऊस पडण्याचे संकेत देत होती. त्यानुसारच पाऊस आला. मात्र, हा पाऊस पिकांना वाहून नेणारा ठरत आहे.

महाराष्ट्रात माळीण, इर्शाळवाडी आणि अनेक रस्त्यांच्या कडेच्या दरडी कोसळण्याच्या घटना आपणास ज्ञात आहेत. गतसाली उत्तराखंडमध्ये दरडी मोठ्या प्रमाणात कोसळल्या होत्या. यावर्षी त्याची पुनरावृत्ती झाली. त्याखेरीज यावर्षी वायनाडमधील घटना मनाला चटका लावणारी ठरली. दरडी कोसळल्याने मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्त हानी होण्याची परिस्थिती दक्षिण आणि उत्तरेत उद्भवली आहे. अशा प्रकारे दरडी कोसळण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. वायनाडमध्ये दरड कोसळून शेकडो जीव गेले आहेत. उत्तराखंडमध्येही मोठ्या प्रमाणात वित्त आणि काही प्रमाणात जीवित हानी झाली आहे. या पार्श्वभूमीवर दरडी कोसळण्याचे प्रमाण का वाढत आहे, याचा साकल्याने वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करणे गरजेचे आहे.

अविचारी विकास हे दरडी कोसळण्यामागे महत्त्वाचे कारण आहे. उत्तर भारत आणि पश्चिम घाटातील डोंगररांगा मातीच्या आहेत. याच भागात दरडी कोसळण्याचे प्रमाण जास्त आहे. दरड कोसळली की महामार्ग, रेल्वे मार्ग थांबतात. वाहने जाताना दरड कोसळून जीवित आणि वित्त हानी होते. माणसाची काही काळासाठी त्या मार्गावरील गती थांबते. त्यामुळे दरड कोसळताच माध्यमे मोठ्या बातम्या प्रसिद्ध करतात. आज ज्या पद्धतीने विकास सुरू आहे ते पाहता भविष्यात दरड कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढच होणार आहे.

दरड म्हणजे डोंगराची तीव्र कडा होय. निसर्गतः असे नैसर्गिक तीव्र कडे फारच कमी तयार होतात. जे तयार होतात ते कठीण दगडांच्या भागात. मात्र, आपण जेव्हा डोंगरामधून लोहमार्ग, रस्ता तयार करतो, तेव्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूला दरडी तयार होतात. किमान रस्त्याच्या एका बाजूला तरी दरड राहते. मुख्यत्वे डोंगरातून मार्ग बनवताना बहुतांश दरडी तयार झाल्या आहेत. दरडी कोसळण्याची नैसर्गिक आणि कृत्रिम कारणे आहेत. भूकंपामध्ये जमीन खचते आणि भूस्खलन होते. अशावेळी दरड नैसर्गिकरित्या कोसळते. अतिवृष्टीमुळे दरडी कोसळण्याच्या नैसर्गिक घटना नाहीतच. त्या भागात मानवी हस्तक्षेप झाल्याखेरीज घडत नाही. मोठ्या प्रमाणात मातीचा ढीग किंवा खडक मूळ भागापासून सुटून कडा कोसळतो, त्यास दरड कोसळणे किंवा भूस्खलन असे म्हणतात. कठीण पाषाणात निसर्गतः भेगा किंवा फटी असतात. उन, वारा पाऊस यांचा परिणाम होऊन खडकाचे तुकडेही होतात. या भेगा वाढून त्यामध्ये पाणी साठले की दगडाचे किंवा भूभागाचे वजन वाढते आणि तो खडक उताराच्या बाजून घसरतो. ही नैसर्गिक दरड कोसळण्याची प्रक्रिया असते.

सध्या दरड कोसळल्याच्या येणाऱ्या बातम्या या त्या भागातील मानवी हस्तक्षेप वाढल्याने आहेत. काही वर्षांपूर्वी माळीण गाव पूर्ण गाडले गेले होते. ती घटना सुरुवातीला नैसर्गिक मानली गेली. मात्र, ती घटनासुद्धा तेथील डोंगरावर शेतासाठी बांध घातल्याने, कृत्रिम कारणाने घडली होती. निसर्गात आढळणाऱ्या सर्व पदार्थांना एकत्रित बांधून ठेवण्याचे कार्य करणारी बले असतात. एकाच प्रकारच्या रेणूंना किंवा अणूंना संसजी (cohesive) बले बांधून ठेवतात. पाणी आपणास द्रव रूपात मिळते, कारण पाण्याच्या रेणूंमध्ये संसजी बल असते. सोने-चांदीचे दागिने बनवता येतात, कारण त्यांच्या अणूंत संसजी बल पाण्यापेक्षा जास्त असते. दोन भिन्न प्रकारच्या रेणूंमध्ये असंसजी (Adhesive) बल असते. या बलांमुळे पाण्याचे रेणू पात्राला चिकटून राहतात. असंसजी बलामुळे दगड आणि माती एकत्र राहतात. संसजी किंवा असंसजी बल जितके जास्त असेल तितका पदार्थ कठीण बनतो. मातीमध्ये असणाऱ्या कणांमध्ये संसजी बल कमी असल्याने मातीचे कण सहज वेगळे होऊ शकतात. दगडाच्या कणातील बल मातीपेक्षा जास्त असल्याने दगड कठीण असतो. दगड आणि माती यांनी बनलेल्या दरडी कोसळण्याची शक्यता जास्त असते. कठीण खडकांच्या दरडी कोसळण्याची शक्यता अत्यल्प असते.

माती आणि दगडातील संसजी आणि असंसजी बले जास्त नसली तरी अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी स्थिर पडलेले असतात. त्यावर उगवलेले गवत मातीला आणि झाडांची मुळे दगड, मातीला घट्ट पकडून ठेवतात. नैसर्गिकरित्या तयार झालेल्या उतारावरून पावसाचे पाणी वाहून जाते. त्यामध्ये मातीचा अंश फार कमी असतो. मात्र, मानवाने मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली. शेतीसाठी डोंगर माथ्यावरील झाडे तोडली. गवताचे आवरण नष्ट केले. डोंगरमाथ्यावरील बांधामुळे माथ्यावर पाणी साठू लागले. हे पाणी डोंगरावर असणाऱ्या भेगांमध्ये मुरते. या पाण्यामुळे माती सुटी होते, कारण माती आणि पाण्याच्या रेणूमध्ये असंसजी बल दगड आणि मातीतील बलापेक्षा जास्त असते. दगडाला पकडून ठेवणारी माती सुटी झाली की दगड गुरुत्वाकर्षण बलामुळे चिखलात रूतायला सुरुवात होते. दगड-माती सगळे काही गुरुत्वीय बलांमुळे खाली घसरते.

रस्ते बनवताना, लोहमार्ग तयार करताना विक्रमी वेळेत काम पूर्ण करण्यासाठी पोकलॅंडसारखी जास्त ताकतीची यंत्रे वापरली जातात. त्यांच्या धक्क्यामुळे दरड तयार होताना, दरडीमध्ये असणाऱ्या दगड आणि मातीमध्ये भेगा पडतात. या भेगांमध्ये पाणी मुरते आणि दरडी कोसळतात. जेथे दगड आणि मातीच्या दरडी असतात, तेथे जाळी आणि त्यावर काँक्रीट आवरण घालून धोका कमी करता येतो. आज सर्वत्र शाश्वत विकास म्हणजे निसर्गाला कमीत कमी हानी पोहोचवत विकास करण्याची चर्चा होते. त्यासाठी रस्ते बनवताना नैसर्गिक रचना न बदलता रस्ते बनायला हवेत. जोवर आपण शाश्वत विकासाच्या केवळ गप्पाच मारणार, तोवर दरडी कोसळणार...

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : [illegible]